# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:23.02.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

१. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार देशातल्या गरीब जनतेचं स्वतःच्या घराचं स्वप्न पूर्ण करत असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

२. देशाच्या विकासाचं नेतृत्व युवकांनी स्वीकारण्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं छत्रपती संभाजीनगर इथं दीक्षांत समारंभात आवाहन

३. पंतप्रधान मोदी आज मन की बात द्वारे त्यांचे विचार देशवासीयांपुढे मांडणार आणि

४. चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारताची पाकिस्तानशी लढत

**अमित शहा पुणेदौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार देशातल्या गरीब जनतेचं स्वतःच्या घराचं स्वप्न पूर्ण करत आहे. नागरिकांचं घरांचं स्वप्न पूर्ण करण्यासोबतच, सरकार त्यांना स्वयंपाकाचा गॅस सौर उर्जेचाही पुरवठा करत असल्याचं केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. शाह यांनी काल पुण्यात झालेल्या एका कार्यक्रमात प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्याअंतर्गत लाभार्थ्यांना स्वीकृती पत्रांचं वितरण केलं त्यावेळी ते बोलत होते. देशात ‘सर्वांसाठी घरें या धोरणाच्या माध्यमातून महिला, आर्थिक दुर्बल, दलित, आदिवासी अशा सर्व घटकांना घरकुले देण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या माध्यमातून सन 2029 पर्यंत देशात पाच कोटी घरे देण्यात येणार असून यापैकी तीन कोटी 80 लाख घरे बांधून पूर्ण झाली आहेत, असंही शहा यांनी यावेळी सांगितलं. या कार्यक्रमात शहा यांच्या हस्ते राज्यातल्या 20 लाख लाभार्थींना स्वीकृती पत्र आणि 10 लाख लाभार्थींना पहिल्या हप्त्याची रक्कम वितरित करण्यात आली. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि
उपमुख्यमंत्री अजित पवारही उपस्थित होते.

**पश्चिम वि.परिषद**

केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी काल त्यांच्या पुणे दौऱ्यात गृह मंत्रालयाच्या पश्चिम विभागीय परिषदेची 27 वी बैठक घेतली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, दादरा नगर हवेली आणि दीव दमणचे प्रशासक प्रफुल पटेल तसंच या विभागातल्या राज्यांचे इतर प्रतिनिधी उपस्थित होते.

**शहा जनता सहकारी**

देशातील प्रत्येक कुटुंबाची भरभराट व्हावी यासाठी प्रत्येक व्यक्तीला तिच्या क्षमतेनुसार काम पुरवून तिला देशाच्या विकासाशी जोडणं हे केवळ सहकार चळवळीमुळेच साध्य होऊ शकेल, असं प्रतिपादन केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी केलं. पुणे इथं जनता सहकारी बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात बोलत होते. सहकारी संस्थांच्या केंद्रीय निबंधक सोसायटीचं देशातील पहिलं क्षेत्रीय कार्यालय पुण्यात सुरू करण्यात येणार आहे, त्याचप्रमाणं देशभरातील सहकारी बँकांना सहकार्य करुन आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी एक संघटना स्थापन करण्यात आल्याची माहिती त्यांनी या कार्यक्रमात दिली.

**धनखड**

विकसित भारतासाठी नव्या संधींचा लाभ घेऊन युवकांनी देशाच्या विकासाचं नेतृत्व स्वीकारण्याची गरज उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी व्यक्त केली. महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा 65 वा दीक्षांत समारंभ धनखड यांच्या उपस्थितीत पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. देशात प्रचंड क्षमता असून पायाभूत सुविधा, दळणवळण, इंटरनेट सुविधा, तंत्रज्ञानाचा विविध क्षेत्रात उपयोग करुन आपण पुढे जात आहोत असं ते म्हणाले. यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते पी.एम.उषा मेरु योजने अंतर्गत मंजूर चार इमारतींचं दूरस्थ पद्धतीनं भूमिपूजन करण्यात आलं. या कार्यक्रमापूर्वी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, कुलपती सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते नाट्यगृह परिसरात वृक्षारोपण करण्यात आलं.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज त्यांच्या 'मन की बात' या मासिक कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांशी हितगुज करणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 119वा भाग आहे. आज सकाळी 11 वाजता आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून, आकाशवाणीचं संकेतस्थळ तसंच न्यूजऑन ए आय आर या मोबाईल ॲपवरुन तो प्रसारित केला जाईल.

**पीएम दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून पुढील तीन दिवस मध्यप्रदेश, बिहार आणि आसाम या राज्यांचा दौरा करणार आहेत. या दौऱ्यात त्यांच्या हस्ते आज दुपारी मध्यप्रदेशच्या छत्रपूर जिल्ह्यात बागेश्वर धाम वैद्यकीय आणि विज्ञान संशोधन संस्थेची पायाभरणी करण्यात येणार आहे. या कर्करोग रुग्णालयात अत्याधुनिक यंत्रं आणि निष्णात डॉक्टरांकडून वंचित वर्गातील कॅन्सर रुग्णांवर मोफत उपचार केले जाणार आहेत. पंतप्रधान भोपाळ इथं दोन दिवसीय जागतिक गुंतवणूकदार परिषदेचंही उद्घाटन करणार आहेत. उद्या ते बिहारमधील भागलपूर इथं रवाना होतील.

**महाकुंभ**

उत्तरप्रदेशमधील प्रयागराज इथं सुरू असलेल्या महाकुंभमध्ये आतापर्यंत 60 कोटी 74 लाखांहून अधिक भाविकांनी त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केलं आहे. या भव्य मेळ्यात अजूनही दररोज लाखो भाविकांचा ओघ सुरू आहे. केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर, केंद्रीय आरोग्य मंत्री आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांसारख्या अनेक नामवंत व्यक्तींसह काल दिवसभरात एकंदर 43 लाख लोकांनी पवित्र स्नान केल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**क्षयरोग मोहीम**

केंद्रीय आरोग्य आणिकुटुंब कल्याण मंत्रालयाच्या 100-दिवसीय क्षयरोग निर्मूलन मोहिमेत संपूर्ण देशभरात 10 कोटींहून अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये 5 लाखांहून अधिक बाधित रुग्ण आढळले आहेत. या मोहिमेत 455 जिल्ह्यांमध्ये तीन लाख 57 हजार क्षयरुग्णांचं निदान झालं आहे. या मोहिमेत 10 लाख शिबिरांचं आयोजन करण्यात आलं होतं. तसंच दुर्गम भागात ही मोहीम पोहोचवण्यासाठी 836 निक्षय वाहनं आणि दोन लाख 40 हजार निक्षय मित्रनियुक्त करण्यात आले होते.

**पोप फ्रान्सिस**

पोप फ्रान्सिस यांना श्वसनाचा तीव्र त्रास होऊ लागल्यामुळे त्यांची प्रकृती गंभीर बनल्यानं त्यांना प्राणवायूचा बाहेरून पुरवठा करण्यात येत असून त्यांची प्रकृती अद्यापही चिंताजनकच आहे. 88 वर्षे वयाच्या पोप फ्रान्सिस यांना न्यूमोनिया आणि फुफ्फुसांत जंतुसंसर्ग झाल्यानं गेला आठवडाभरापासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांच्या प्लेटलेटसची पातळी बरीच कमी झाल्यानं त्यांचं रक्तही बदलण्यात आलं होतं.

**डॉ.एस.जयशंकर**

आरोग्यसेवा हा विशेषाधिकार नसून मूलभूत अधिकार आहे असं मत परराष्ट्र मंत्री डॉकटर एस.जयशंकर यांनी व्यक्त केलं. ते काल नवी दिल्लीत 12 व्या आंतरराष्ट्रीय आरोग्य संवाद कार्यक्रमात बोलत होते. आयुष्मान भारत आरोग्य विम्यासारखे उपक्रम करोडो नागरिकांपर्यंत पोहोचल्याचं सांगत जागतिक आरोग्य सुरक्षेसाठी आरोग्य सुविधा पुरविणाऱ्या भारताच्या योगदानाचाही त्यांनी उल्लेख केला.

**इस्रायल पॅलेस्टाईन**

इस्रायलनं 620 पॅलेस्टिनी कैद्यांना मुक्त करण्याचं काम लांबणीवर टाकलं आहे. जोपर्यंत हमास या पॅलेस्टिनी दहशतवादी संघटनेकडून इस्रायली ओलिसांच्या पुढील सुटकेची खात्री होत नाही आणि त्यांची अपमानास्पद पद्धतीनं मुक्तता करण्याचा प्रकार थांबवला जाणार नाही तोपर्यंत कैद्यांची मुक्तता केली जाणार नाही, असं इस्रायलनं म्हटलं आहे. हमासनं काल सहा इस्रायली ओलिसांना सार्वजनिकरीत्या सुपूर्द केल्यानंतर इस्रायल सरकारनं हा निर्णय घेतला आहे.

**तेलंगण मजूर**

तेलंगणच्या नागरकुर्नूल जिल्ह्यातील डोमालापेंटानजीक श्रीशैलम डाव्या कालव्याच्या बोगद्याच्या छताचा भाग कोसळल्यानं बोगद्यात अडकून पडलेल्या आठ व्यक्तींच्या सुटकेसाठी वेगानं प्रयत्न सुरू आहेत. काल सकाळी ही दुर्घटना घडली. राज्याच्या पाटबंधारे विभागाच्या आणि पर्यटन मंत्र्यांच्या देखरेखीखाली बचाव कार्य राबविण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बोगद्यात अडकलेल्यांच्या सुटकेसाठी केंद्राकडून सर्वतोपरी मदत देण्यात येईल आश्वासन दिलं आहे.

**पर्यटकांचा मृत्यू**

सिंधुदुर्ग जिल्हयातील तारकर्ली इथं पर्यटनासाठी गेलेल्या पुण्यातील दोन युवकांचा काल सकाळी समुद्रात बुडून मृत्यू झाला. एक युवक गंभीर असून त्याच्यावर मालवण ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तारकर्ली समुद्रात काल सकाळी, पुण्यातील हडपसर इथं राहणारे पाच युवक पोहण्यासाठी उतरले होते. त्यातले तीन युवक पाण्यात बुडल्याची दुर्घटना घडली.

**क्रिकेट**

चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अ गटात आज भारत आणि पाकिस्तान हे पारंपरिक प्रतिस्पर्धी संघ परस्परांशी भिडणार आहेत. आज दुपारी अडीच वाजता दुबई इंटरनॅशल स्टेडियमवर या सामन्याला सुरुवात होणार आहे. या स्पर्धेत बुधवारी भारतानं बांगलादेश विरुद्धच्या सामन्यात विजय

मिळवला होता.  तर पाकिस्तानचा न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या सामन्यात 60 धावांनी पराभव झाला होता.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.**